**राज्यातील नक्षलग्रस्त भाग घोषित करणे.**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग (विशेष)**

शासन निर्णय क्रमांक :- एनएएक्स ०९१२/प्र.क्र.३६९/विशा १ (ब)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक :- ०४ फेब्रुवारी, २०१३

वाचा :- १) शासन निर्णय क्र.एनएएक्स २००४/प्र.क्र.४८/वि.शा.१ ब, दि.०७.१२.२००४
२) शासन निर्णय क्र.एनएएक्स २००५/प्र.क्र.१४/वि.शा.१ ब, दि.२०.०५.२००५
३) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१-ए/१९५/नक्षलग्रस्त भाग/१५८/२००७, दिनांक २२.०८.२०१२

**<u>प्रस्तावना</u> :-** राज्यातील काही भागांमध्ये नक्षलवाद्यांच्या कारवाया वाढल्याने राज्यातील जिल्ह्यामधील तालुके / गावे संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक ०७.१२.२००४ व दिनांक २०.०५.२००५ अन्वये नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात आली होती. राज्यातील नक्षलग्रस्त भाग घोषित करण्याबाबत दरवर्षी जानेवारी महिन्यात आढावा घेऊन आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्याचे प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून पाठविण्याबाबत सूचना आहेत. त्यानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी राज्यातील सध्याच्या परिस्थितीनुसार नक्षलग्रस्त भाग घोषित करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २२.०८.२०१२ अन्वये शासनास सादर केला आहे.

**<u>शासन निर्णय</u> :-**

राज्यातील सध्याच्या परिस्थितीनुसार नक्षलग्रस्त भाग घोषित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सबब दिनांक ०७.१२.२००४ व दिनांक २०.०५.२००५ चे संदर्भाधिन शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून याद्वारे गडचिरोली, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांमधील खालीलप्रमाणे तालुके नक्षलग्रस्त म्हणून घोषित करण्यात येत आहेत :-

| अ.क्र. | जिल्हा | जिल्ह्यातील तालुके |
|---|---|---|
| १. | गडचिरोली | संपूर्ण जिल्हा |
| २. | गोंदिया | सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव व सडक अर्जुनी हे तालुके |
| ३. | चंद्रपूर | गोंडपिपरी, राजूरा व जिवनी हे तालुके |

वर नमूद केलेल्या जिल्ह्याच्या भागाच्या तसेच राज्यातील इतर भागाच्या नक्षलग्रस्ततेसंदर्भात जानेवारी, २०१४ मध्ये आढावा घेऊन आवश्यकतेनुसार त्यात बदल करण्यासंदर्भातील प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे शासनाकडे पाठवतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सुधाकर चव्हाण )
सह सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
सर्व मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग
विभागीय आयुक्त, मुंबई / नागपूर / पुणे / औरंगाबाद / अमरावती / नाशिक.
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व विभाग प्रमुख.
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक.
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, नागपूर.
सर्व पोलीस आयुक्त.
सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक.
सर्व मंत्रालयीन विभाग.
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
सर्व कोषागार अधिकारी
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
गृह विभागातील सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी.
रोख शाखा, गृह विभाग.
निवडनस्ती (वि.शा.१ ब)

मप २२०६-१४